PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 5

# ग्रामीण विकासात शासकीय योजनाची भूमिका

**प्रा. राजकुमार बबनराव रिकामे**
सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र वभाग
**शरदचंद्रजी पवार महाविद्यालय,**
**जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे.**
**महाराष्ट्र (भारत)**

---

**प्रस्तावना :**

भारत हा प्रामुख्याने खेडयांचा देश आहे. या देशाचा विकास जर साधावयाचा असल्यास ग्रामीण भागातील विकास प्रथम साध्य करणे आवश्यक आहे. ग्रामीण विकासाची संकल्पना सातत्याने बदलत चाललेली दिसून येते. प्राचीन काळापासून ग्राम हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. महात्मा गांधी म्हणतात, भारत हा खेडयांचा देश आहे. आजच्या काळात मात्र ग्रामीण विकासाकडे पारंपरिक दृष्टिकोनातून पाहिले जात नाही.

**ग्रामीण विकासाचा अर्थ :**

सुरुवातीच्या कालखंडामध्ये ग्रामीण विकास म्हणजे फक्त कृषीचाच विकास समजले जात असे. मात्र काळानुरुप ग्रामीण विकासाची संकल्पना आमुलाग्र बदललेली आहे. त्यामध्ये फक्त कृषीच नसून अनेक घटक समाविष्ट झालेले दिसतात. यामध्ये शिक्षण, आरोग्य, नवरोजगार निर्मिती, वाहतूक सोयी इ. सारख्या अनेक गोष्टींचा समावेश आहे.

**व्याख्या :**

1) जागतिक बँकेच्या मते, ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण समूहातील विशेषत: गरीब लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी निश्चित केलेली रणनिती होय.
2) ए.आर. पटेल यांच्या मते, ग्रामीण भागातील लोकांचा आणि परिसराचा झालेला विकास म्हणजे ग्रामीण विकास होय.
3) रॉबर्ट चेंबर्सच्या मते, ग्रामीण विकास म्हणजे समाजातील एका विशिष्ट गटाला विकसित करण्यासाठी युक्ती आहे. म्हणजेच ग्रामीण भागातील महिला, पुरुष व मुले यांना लागणाऱ्या गोष्टीची पूर्तता होय.
4) जी.पार्थसारथी यांच्या मते, ''ग्रामीण विकासाचा संबंध मानवी आणि भौतिक साधनांचा सदुपयोग करुन गरिबांच्या राहणीमानात सुधारणा करणे व त्यांच्या जीवनस्तर उंचावणे हा आहे. यासाठी पैसा आणि तंत्रज्ञान यांचा चांगला उपयोग व गरिबांची सक्रीय भागिदारी आवश्यक असते.

**ग्रामीण विकासाची उद्दिष्टे :**

1) ग्रामीण भागातील वाहने स्थलांतर थांबविणे.
2) ग्रामीण भागाला विकासाच्या प्रक्रियेने सामावून घेणे.
3) ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक विकास वाढविणे.
4) ग्रामीण भागात वाढीव उत्पादन आणि उत्पादकता साध्य करणे.

**अध्ययनाचे उद्देश :**

1) ग्रामीण विकासात शासनाच्या उपाय योजनांच्या योगदानाचा अभ्यास करणे.
2) ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान अभ्यासणे.
3) शासकीय योजनांच्यामुळे सामाजिक बदलांचा अभ्यास करणे.

**ग्रामीण विकासाचे काही महत्त्वाचे कार्यक्रम किंवा योजना :**

ग्रामीण भागाचा विकास हा दोन पातळयावर होण्याची आवश्यकता दुसऱ्या योजनेच्या सुरुवातीच्या काळात आवश्यक वाटू लागली. एका पातळीवर भौतिक विकास तर दुसऱ्या पातळीवर मूलभूत विकास महत्त्वाचा आहे.

भौतिक विकासात रस्ते, पाणी, उर्जा तर मुलभूत विकासात शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती दारिद्रय निर्मूलन इत्यादी उपाय योजना किंवा कार्यक्रम आखणे महत्त्वाचे आहे. त्यासाठीच शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने ग्रामीण विकास विभागाची स्वतंत्र कार्यक्रम/योजना राबविल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे–

**1) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना :**

4 सप्टेंबर 2005 रोजी सरकारने आदेश पत्रान्वये राष्ट्रीय स्तरावर ग्रामीण रोजगार हमी कायदा पास केला. देशाच्या ग्रामीण भागातील विविध जाती जमातीतील स्त्री–पुरुष अशा प्रकारचा रोजगार मिळविण्यास पात्र होतात.

2 ऑक्टोबर 2009 पासून या योजनेचे नामकरण 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' मनरेगा असे करण्यात आले. राष्ट्रीय स्तरावर रोजगार पुरविणारी ही जगातील सर्वात मोठी योजना मानली जाते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्रातील नोंदणीकृत ग्रामीण घरातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीस रोजगाराचा हक्क देण्यात आला. किमान शंभर दिवस सार्वजनिक कार्याशी संबंधित असणाऱ्या ठिकाणी ठराविक किमान रोजंदारीवर काम देण्याची हमी हा कायदा देतो.

यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील बेरोजगारीचा प्रश्न सोडवून तेथे कायमस्वरुपी सुविधा निर्माण करणे तसेच शहराकडे होणारे लोकांचे स्थलांतर थांबविणे.

**2) इंदिरा आवास योजना :**

व्यक्तीच्या मूलभूत गरजांपैकी घर ही अत्यावश्यक गरज आहे. उद्‌दिष्ट डोळयासमोर ठेऊन सरकारने ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना निवारा देण्यासाठी 1985–86 साली इंदिरा आवास योजना सुरु केली. पूर्वी ही योजना जवाहर रोजगार योजनेअंतर्गत सुरु होती. 1986 नंतर मात्र ही स्वतंत्ररित्या राबविण्यात येऊ लागली. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हयातील एकूण घरकुलापैकी 60 टक्के अनुसूचित जाती–जमातीकरीता तर 15 टक्के अल्पसंख्यांकाकरीता व 3 टक्के अपंगासाठी घरकुले मंजूर करणे बंधनकारक करण्यात आली आहेत. मात्र जिल्हयांना जे उद्‌दिष्ट दिले जाते. त्या उद्‌दिष्टांच्या हे तुलनेत ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या घरकुलांची संख्या फारच कमी असते. योजनेच्या सुरुवातीपासून जानेवारी 2010 पर्यंत सुमारे 2.2 कोटी घरांचे बांधकाम करण्यात आले आहे.

**3) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान योजना :**

अशुद्धपाणी, अस्वच्छ परिसर व वैयक्तिक स्वच्छतेअभावी उद्‌भवणाऱ्या रोगांमुळे पिडीत असलेल्यांची आकडेवारी पाहता ग्रामीण स्वच्छता विषयक कार्यक्रम फारसा सफल न झाल्याची जाणीव झाल्याने शासनाने या कार्यक्रमात थेट जनतेलाच सहभागी करुन घेतले आणि संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सुरु केले. याची सुरुवात 2001 मध्ये करण्यात आली. ग्रामीण भागात स्वच्छतेचे महत्त्व पटावे या हेतूने या योजनेचा जन्म झाला. गावातील लोकांमध्ये स्वच्छतागृहाबाबत मोठी उदासीनता आणि गैरसमज होते. त्यामुळे सुरुवातीच्या काळात लोक सहजासहजी शौचालय बांधण्यास तयार होत नसत. परंतु जसजसे लोकांना महत्त्व पटू लागले. तसतसे या योजनेचे महत्त्व लोकांना पटण्यास सुरुवात झाली.

**4) महात्मा गांधी तंटामुक्ती मोहीम योजना :**

गावात निर्माण होणारे ताण–तणाव, भांडणे जर गावपातळीवरच मिळवली तर अनेक प्रश्न सुटू शकतात. न्यायालयीन खटल्यातून होणारा शारीरिक, मानसिक, आर्थिक त्रास टाळण्याबरोबरच सहकार्याने स्वतःची पर्यायाने गावाची प्रगती साधली जाते. या हेतूने गृहखात्याच्यावतीने महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजना सुरु करण्यात आली आहे. दाखल झालेले खटले मिटविणे, नव्याने निर्माण होणारे तंटे गावपातळीवरच मिटवणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे हा या योजनाचा उद्‌देश आहे.

**5) तीर्थक्षेत्र विकाय कार्यक्रम :**

ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविक यात्रेकरुंना विविध नागरी सुविधा पुरविणे ग्रामपंचायतींना तुटपुंज्या उत्पन्नामुळे शक्य होत नाही. यासाठी शासनाने ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत गावातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी अंतर्गत रस्ते, पाणी पुरवण्याची व्यवस्था करणे, सार्वजनिक स्वच्छतागृहे, वाहनतळ, यात्रीनिवास, आणि बाग इत्यादी सुविधा निर्माण केल्या जात आहेत.

**6) इंदिरा गांधी निराधार व भूमीहीन शेतमजूर महिला अनुदान योजना :**

या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील निराधार व भूमीहीन असलेल्या शेतमजूर महिलांना या योजनेअंतर्गत रु.450 चे अर्थसाहाय्य दिले जाते. यासाठी संबंधित महिलेचे वय 60 ते 65 वर्षाच्या दरम्यान असावे. या योजनेअंतर्गत निराधार विधवा, परितकत्या, अत्याचारित महिला, घटस्फोट प्रक्रियेतील स्त्रिया, कुंटुब प्रमुख पुरुष, तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या व्यक्तीची पत्नी, वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या स्त्रिया, अनाथ मुली यांनाही दरमहा रु.450 अर्थसाहाय्य दिले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी तहसिलदार कार्यालयात संपर्क साधावा लागतो.

**7) कुटुंब अर्थसाहाय्याची योजना :**

कुटुंबाच्या एकूण उत्पन्नात मोठा वाटा असलेल्या प्रमुख कमावत्या पुरुष अथवा स्त्रिचा मृत्यू झाल्यास अशा कुटुंबांना या योजनेचा फायदा मिळतो. सदर कुटुंबातील मृत पावलेल्या स्त्री–पुरुषांचे वय हे 18 ते 64 वर्ष दरम्यान असावे. तसेच हे कुटुंब दारिद्रय रेषेखाली असावे. योजनेचा लाभ मृत्यू पावलेल्या स्त्री–पुरुषांच्या विधुरास, विधवेस अज्ञान मुलांना, अविवाहीत मुलींना तसेच त्यांच्यावर अवलंबून असलेल्या आई–वडिलांना मिळेले.

**ग्रामीण विकासासमोरील अडथळे :**

1) ग्रामीण भागात अद्याप पुरेशी वीज पोहचलेली नाही.
2) ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर.
3)परंपरागत शेती आणि राहणीमान या पद्धतीवर विश्वास, आधुनिकतेची कास धरण्यात उदासीनता.
4) निरक्षरता हा ग्रामीण विकासाचा प्रमुख अडथळा आहे.

**ग्रामीण विकासयोजनांचे महत्त्व :**

1) देशाचा सर्वांगीण विकास साध्य करता येतो.
2) गरिबीचे निर्मूलन करुन सर्वांना संधीची समानता उपलब्ध करुन देता येते.
3) ग्रामीण विकासाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक बदल घडविता येतो.

**निष्कर्ष :**

1) रोजगार निर्मिती हे गरिबी व दारिद्रय निर्मूलनाचे सर्वात महत्त्वाचे साधन असल्याने शासनाचे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समाजाच्या विकासासाठी प्रयत्न केले आहेत. त्यातून आज ग्रामीण विकास होत आहे.

2) ग्रामीण विकास हाच देशाच्या खऱ्या अर्थाने विकास आहे.

3) भारताला एक जागतिक महासत्ता व्हायचे असल्यास पायापासून शिखरापर्यंत विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी ग्रामीण विकास आवश्यक आहे.

4) या योजनांच्या ध्येय–उद्दिष्टे आणि धोरणावर जर लक्ष केंद्रित केले तर असे लक्षात येते की, खरोखरच मनापासून जर या योजनांतर्गत कार्यक्रमाची अंमलबजावणी केली गेली तर इतर प्रगत राष्ट्रांच्या रांगेत जाऊन बसायला भारताला वेळ लागणार नाही.

## संदर्भ सूची :

1. कदम के.के.–ग्रामपंचायत आणि ग्रामीण विकास, हरनाई प्रकाशन, 2011.
2. चौधरी दत्तात्रय – ग्रामपंचायत अधिनियम, जळगाव, चौधरी लॉ बुक पब्लिकेशन–2005.
3. दर्शनकार अर्जुन– पंचायतराज आणि नागरी प्रशासन आणि प्रशासन, औरंगाबाद.
4. वर्मा सवलिया– ग्रामीण विकास, अविष्कार पब्लिशर्स, जयपूर, 2005.
5. महाराष्ट्र शासन– दृष्टीक्षेपात ग्रामीण विकास योजना.
6. पाटील मनोज– केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना, चौधरी लॉ पब्लिशर्स, पुणे.
7. रोजगार हमी योजना कायदा– नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई, 1977.
8. www.mahagov.in
9. www.drd.nic.in
10. www.grampanchyat.in
11. www.yashada.org